पशुविशेष

# पशुपालनात महिलांचा महत्त्वपूर्ण सहभाग

**प्रा.डॉ. मंजुषा पाटील**
पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी
**प्रा.डॉ. पंकज हासे**
पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई
**प्रा.डॉ. मीनाक्षी पाटील**
कृषी महाविद्यालय, परभणी



भारत हा एक कृषिप्रधान देश आहे आणि पशुपालन व्यवसाय हा त्याचा अविभाज्य घटक आहे. खेडोपाडी पशुधनास विशेष महत्त्व आहे; तसेच ग्रामीण भागातील महिला देशाच्या विकासाचा महत्त्वपूर्ण कार्यभार सांभाळतात. याप्रकारे अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या स्त्रियांच्या पशुसंवर्धनातील सहभागाविषयी घेतलेला हा एक आढावा...

पावसाच्या अकाली वृष्टीचा तसेच अभावाचा जेवढा शेतीपिकांवर परिणाम होतो तेवढा पशुधनावर होत नाही. पशुधन हे कुटुंबाच्या उत्पन्नात अधिक महत्त्वाचे आहे. विशेषत: दुष्काळी परिस्थितीत पशुधनात सहसा लहान व मोठ्या दोन्ही जनावरांचे एकत्र संगोपन व व्यवस्थापन केले जाते. म्हणूनच नेहमी गाय किंवा म्हशींसोबत शेळ्या किंवा कुक्कुटपालन असे चित्र भटक्या जातींतील कुटुंबांत दिसून येते. 'बायफ' या संस्थेच्या एका अभ्यासानुसार असे आढळून आले की, उत्तर गुजरात व पश्चिम राजस्थान अशा उष्ण व समशीतोष्ण भागातील कुटुंबांच्या उत्पादनात पशुधनाचा ४५ ते ५२ टक्के सहभाग आहे. तसेच असेही आढळून आले आहे की, तामिळनाडूतील नमक्कल जिल्ह्यात पशुव्यवस्थापन, पशूंचा आहार, आरोग्य व पैदास यामध्ये स्त्रियांचा अधिक सहभाग आहे. पण पशूंची विक्री, बाजार, पशूंच्या खरेदीसाठी असलेल्या विविध योजनांची निवड तसेच सर्व बाबींची नोंद करून ठेवणे यात महिला कमी सहभागी असतात.

## ऐतिहासिक महिलांच्या कार्याची पशुसंगोपनात नोंद

पुराणामध्ये, श्रीकृष्णाच्या राज्यात पशुसंगोपनात व दुग्धपदार्थ बनवण्यात महिलांचा सहभाग अधिक होता याचे बरेच पुरावे आहेत. कित्येक वर्षांपासून महिलांचा पशुउत्पादनात सहभाग आढळून येतो. विशेषत: आशियायी देशांमध्ये पशू उत्पादन हे कुटुंबाच्या उत्पादनातला मोठा भाग आहे.

प्रत्येक प्रदेशाच्या भौगोलिक, सामाजिक व्यवस्थेनुसार वेगवेगळ्या पद्धतीने पशुसंगोपन केले जाते पण तरीही पशुव्यवस्थापनात आणि त्यापासून मिळणाऱ्या इतर पदार्थांच्या उत्पादनात 'स्त्री' हा सर्वस्वी केंद्रबिंदू आहे. असे असतानाही भारतीय ग्रामीण जीवनशैलीमध्ये 'कुटुंबातील मिळकतीची व्यक्ती' म्हणून महिलांकडे पाहिले जात नाही. समाजामध्ये असा गैरसमज आहे की, महिला पुरुषांएवढे काम करू शकत नाहीत. परंतु ठराविक क्षेत्र वगळता परिस्थिती अशी आहे की, महिला पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने जास्त काम करतात. बहुतांश महिला शेती व शेतीपूरक कामे जसे की- पीक कापणी, पिकांना पाणी देणे, जनावरे धुणे, दूध काढणे, दूध प्रक्रिया, शेण काढणे इत्यादी कामे करतात.

## स्त्रीशक्तीचे पशुसंगोपनातील महत्त्व

बरेचदा शेतामध्ये पिकांच्या कापणीपासून ते गोठ्यामधील दुधाच्या प्रक्रियेपर्यंत सर्व कामे महिलाच करतात. जुन्या रुढी आणि परंपरांमुळे स्त्रियांना घराबाहेरील कामे जसे की- बाजारात जाणे आणि खरेदी- विक्री वगैरे गोष्टींसाठी प्रतिबंध केला जातो. त्यामुळे पशुधन व्यवस्थापनात चाऱ्यापासून ते दुग्धप्रक्रियेपर्यंत महिलांचा सहभाग असूनही खरेदी- विक्री ही कामे पुरुष करत असल्यामुळे मिळणारा मोबदला पुरुषांच्या हातात येतो. अशा प्रकारे पशुव्यवस्थापन हे महिलांच्या मदतीशिवाय अपूर्ण असूनही दुर्दैवाने त्यांना त्याचा मोबदला मिळत नाही. परिणामी महिलांचे पशुव्यवस्थापनातील महत्त्व कमी लेखले जाते.

सर्वेक्षणानुसार असेही पाहण्यात आले आहे की, महिलांना बऱ्याच उपलब्ध चाऱ्याविषयी ज्ञान असते. जसे की, दूधवाढीसाठी महत्त्वपूर्ण चारा, औषधी गुण असलेला चारा वगैरे. जनावरांच्या सर्व सवयी व उत्पादनक्षमता याविषयी त्या अधिक जागरूक असतात आणि त्याप्रमाणे त्या जनावरांना चारा घालतात. कुटुंबाच्या रोजच्या आहारात आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी दूध देणाऱ्या गायी आणि म्हशी यांचे पूर्ण योगदान असते. महिला अशी जनावरे निवडताना दुधाची गुणवत्ता, वातावरण आणि उत्पादनाचा दर्जा या गोष्टींना जास्त महत्त्व देतात.

## आधुनिक पशुपालनात महिलांचे योगदान

राष्ट्राचा विकास हा नेहमी पुरुष आणि महिला यांच्या समान सहभागावर अवलंबून असतो. निर्जंतुक दूध उत्पादनासाठी महिला या अधिक प्रभावीपणे योगदान देतात हे लक्षात घेता पशुपालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण देण्याची व्यवस्था ग्रामस्तरावर सर्वत्र उपलब्ध झाली पाहिजे. तसेच हे केंद्र गावातच जवळपास असावे आणि वेळ शक्यतो दुपारची असावी म्हणजे महिला घरच्या कामातून वेळ काढून प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील. ग्रामीण विकास योजनेंतर्गत पशुधन विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासंदर्भात फक्त तज्ञ म्हणूनच नव्हे तर तळागाळात असलेल्या ग्रामीण लोकांच्या विकासाकरिता ठरवलेल्या कार्यक्रमांसाठी महिलांची आवर्जून नियुक्ती केली पाहिजे.

आजच्या युगात पशुविकास क्षेत्रात पुरुष व महिला यांना जर समसमान न्याय व सन्मान द्यायचा असेल तर त्यांना सारख्या संधी व सोयीसुविधा द्याव्या लागतील. असे केले तरच आपण पशुउत्पादनातून राष्ट्राचा विकास करू शकतो. ■